ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# मानवाधिकाराचे स्वरूप आणि महत्त्व

**प्रा. लालचंद एन. मेश्राम**
समर्थ महाविद्यालय लाखणी
जिल्हा भंडारा

मानवाधिकाराची संकल्पना मुख्यत्वे विश्वबंधुत्वाच्या भावनेशी निगडित आहे. मानवाधिकारांच्या संबंध व्यक्तीच्या व्यक्ती विकासाशी जुळलेला आहे. प्रत्येक राष्ट्राने हा अधिकार आपल्या राष्ट्रातील व्यक्तींना बहाल केला तर राष्ट्राचा विकास अधिक गतिशील होवू शकतो. मानव अधिकार मुख्यत्वे नैसर्गिक अधिकार आहे. म्हणूनच सर्व स्तरातील राष्ट्राचे महत्त्वपूर्ण उद्दिष्टे म्हणजे तेथील नागरिकांना स्वतःचा विकास घडवून समान संधी उपलब्ध करून देणे होय. ही विचारधारा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर लागू होणे गरजेचे आहे.

मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना समान हक्क असणे आवश्यक असते. परंतु जगात असे बरेच लोक मानवी हक्कापासून वंचित आहे. जगातील वेगवेगळ्या भागात मानवाधिकारांचे सतत उल्लंघन होत असल्याचे दिसून येते. दुसरे महायुद्ध याचे मुख्य उदाहरण आहे. या महायुद्धात जनतेच्या संपत्तीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या महायुद्धात मानवी हक्कांचेही मोठ्या प्रमाणात उल्लंघन झाले होते. लक्षावधी लोकांना निर्वासितांचे जीवन जगण्यास भाग पाडले गेले. सुसंस्त समाजाचा भाग असल्याने मानवाधिकारांचे संरक्षण करणे प्रत्येक सभ्य समाजाचे महत्व दायित्व ठरते.मानवाधिकारांचे हे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी 10 डिसेंबर 1948

रोजी संयुक्त राष्ट्राने मानवाधिकारा विषयी सर्वत्रीक जाहीरनामा घोषित केला. 1 डिसेंबर 1966 रोजी युनायटेड नेशन जनरल असेंब्लीने नागरी आणि राजकीय हक्कावरील आंतरराष्ट्रीय करार आणि आर्थिक सामाजिक व सांस्तिक हक्कावरील आंतरराष्ट्रीय करार हा मसुदा सादर केला. ज्यावर भारताने सुद्धा स्वाक्षरी केली आहे.

जात, लिंग, राष्ट्रीयत्व, भाषा, धर्म किंवा इतर कोणत्याही आधारावर भेदभाव न करता मानवाधिकार सर्वांना उपलब्ध आहेत. अशी संयुक्त राष्ट्रसंघटनेने मानवाधिकाराची व्याख्या केली आहे.

**मानवाधिकारांचा अर्थ** : मानवी हक्कासाठी मानवाचा संघर्ष शतकानुशतके चालू होता. पुढे लोकतंत्र पद्धतीचा उदय झाला आणि मानवाला मानवी हक्क प्राप्त होण्याची दिसू लागली. समाज जीवन जगताना सुखी आनंदी निरापय आणि भययुक्त जीवनात मानवाला हक्क प्राप्त होणे आवश्यक आहे. व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वोतृष्ट विकास साधता येईल अशी परिस्थिती म्हणजे मानवी हक्क होय किंवा मानवी हक्कांची संकल्पना मानवी प्रतिष्ठेशी बांधील असून मानवाला प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी जे हक्क आवश्यक असतात त्यांना मानवी हक्क असे म्हणतात.

**मानवी हक्काची व्याख्या (Definition)** : (1) दुर्गादास बसू ''मानवी हक्क म्हणजे असे किमान हक्क की जे प्रत्येक व्यक्तीला राज्य किंवा इतर सार्वजनिक सत्तेच्या विरुद्ध अनिवार्यपणे प्राप्त झाले पाहिजेत. कारण प्रत्येक व्यक्ती मानव परिवाराचा एक सदस्य आहे.''

(2) संयुक्त राष्ट्रसंघाचे मानवी हक्क केंद्र : या केंद्राकडून मानवी हक्कांचे वर्णन पुढील शब्दातून करण्यात आले आहेत ''मानवी हक्कांना साधारणतः अशा हक्कांच्या स्वरुपात परिभाषित केले जाऊ शकते की जे आमच्या नैसर्गिक प्रवृत्तीचे अभिन्न भाग आहेत, ज्यांच्याअभावी आम्ही मनुष्य प्राण्याच्या रुपाने जगू शकत नाही.''

(3) आर. जे. विन्सेंट : ''मानवी हक्क असे अधिकार आहेत की जे प्रत्येक व्यक्तीला मनुष्य या नात्याने प्राप्त होतात. या हक्कांचा आधार मानवी स्वभावामध्ये निहित आहे.

(4) एम.एच.बेग : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश एम.एच. बेग यांनी मानवी हक्कांची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मते, ''मानवी हक्कांमध्ये न्याय, समता, भेदभावपूर्ण व्यवहारा पासून मुक्ती आणि स्वेच्छाचारीते ऐवजी स्वातंर्त्याचा भाग निहित आहे.''

(5) डेविड सेलवार्ड : ''मानवी हक्क जगातील सर्व व्यक्तींना प्राप्त आहेत, कारण ते स्वतः मानवीय आहेत. त्यांची निर्मिती करता येत नाही, ते विकत घेता येत नाहीत किंवा करारातून मिळत नाहीत. ''मानवाधिकारांचे स्वरूप (Developing of Human Rights) मानवाधिकारांचा विकास हा हळूहळू झालेला आहे. सर्वप्रथम इंग्लंडमध्ये 1215 ला मॅग्नाकार्टा 'महान घोषणा पत्र' प्रकाशित झाले. त्यामध्ये ''जोपर्यंत एखाद्या व्यक्तीवर अपराध सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला बंदी किंवा निर्वासित करू नये' असा उल्लेख केला.

इंग्लंडमध्ये 1679 मध्ये 'बंदी प्रत्यक्षीकरण अधिनियम' मंजूर केले गेले. त्यामध्ये व्यक्तीवर जोपर्यंत कुठलाही खटला किंवा अपराध सिद्ध होत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला नजरकैदेत ठेवता येणार नाही. त्यानंतर 1689 मध्ये ''अधिकार पत्र''नावाचे पुन्हा एक बिल पारित केले त्यात संसदेमध्ये जनतेच्या प्रतिनिधींना भाषण देण्याचे स्वातंत्र्ये नमूद करण्यात आले. इ. स. 1776 ला संयुक्त राष्ट्र अमेरिकेने स्वातंर्त्याच्या घोषणेबरोबरच मानवाधिकाराच्या घोषणेचे वर्णन केले. 4 जुलै 1776 ला अमेरिका या राष्ट्राने स्वातंर्त्याच्या घोषणेसोबतच म्हटले की, ''आम्ही हे सत्य स्विकार करतो की, सर्व मनुष्य जन्मतः समान आहेत. सर्व मनुष्यांना जन्मताच ईश्वराने काही अधिकार प्रदान केले आहेत. त्या अधिकारांना कोणीही हिसकावून घेऊ शकत नाही, या अधिकारात जीवन जगण्याचा अधिकार, स्वातंर्त्ये उपभोगण्याचा अधिकार व समृद्धीच्या अधिकाराचा समावेश आहे.

इ.स. 1789 फ्रांसच्या क्रांतीत बोरवन वंशाचा शासक लुई 16 वे आणि त्याची साम्राज्ञीचा खूण करून लोकतंत्राची स्थापना केली गेली. त्या क्रांतीत व्यक्तीच्या मुक्तीसाठी पुढील घोषणा केल्या होत्या.

(क) स्वतंत्रता, समानता व बंधुत्वाची घोषणा

(ख) लोकतंत्र व लोकांच्या प्रभुत्वाविषयींच्या सिद्धांताचे समर्थन.

(ग) राष्ट्रीयत्वाच्या सिद्धांताचे समर्थन मानवाधिकाराचे महत्व (Importance of Human Right)

(घ) मानवता हाच धर्म

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात विशेषतः दोन महायुद्धांच्या दरम्यानच्या काळात जगात हुकूमशहांनी आपापल्या देशातील जनतेवर प्रचंड अत्याचार केले. त्यांच्या या .तीमुळे अखिल मानव जात हादरून गेलेली होती. जगातील विविध हुकुमशहांनी निरपराध जनतेला छळल्यामुळे ताणतणाव व संघर्ष निर्माण होतात याचा विचार करून संयुक्त राष्ट्रांनी मानवी हक्कांच्या सनदेत उल्लेख केलेले हक्क सुरक्षित राहावेत यासाठी विशेष तरतूद करून ठेवलेली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या जाहिर नाम्यातील हक्कांचे पालन सर्व सत्ताधाऱ्यांनी मनापासून केले तर जागतिक शांततेसाठी मानवी हक्कांची सनद अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

(ड) शोषणमुक्त समाजाची निर्मिती

मानवाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी स्वातंर्त्य, समता, न्याय, बंधुता यांची आवश्यकता आहे. प्रत्येक व्यक्तीला शोषणापासून मुक्तता हवी असते. माणसाची खरेदी–विक्री, वेठबिगारी या बाबी मानवतेवरचा कलंक आहेत. कोणत्याही व्यक्तीने अन्य कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही स्तरावर शोषण करू नये असे मानलेले असून शोषण मुक्त समाज निर्माण झाला पाहिजे यावर मानवी हक्कांच्या जाहिरनाम्यात भर देण्यात आलेला आहे. त्यामुळे मानवी हक्कांना आंतरराष्ट्रीय समाजातील सर्व घटकांना न्याय हक्कांची व अधिकाराची शाश्वती प्राप्त झाली आहे.

(च) धार्मिक सहिष्णुता : धर्माच्या अभिमानामुळे समाजात ताणतणाव निर्माण होतात असा अनुभव बऱ्याचदा आलेला आहे. त्यामुळे धर्माच्या कारणावरून निर्माण होणारे संघर्ष दूर करण्याचा प्रयत्न मानवी हक्काच्या सनदेत करण्यात आलेला आहे. या सनदेत प्रत्येक व्यक्तीला आपला धर्म आणि आपल्या धार्मिक श्रद्धा जपण्याचा अधिकार दिलेला आहे. तसेच प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्मश्रद्धेची अभिव्यक्ती करता येते. प्रत्येक व्यक्तीचे ध र्मस्वातंर्त्य हा तिचा मूलभूत हक्क आहे हे आज मान्य करण्यात आलेले आहे. आता धर्माच्या कारणावरून आंतरराष्ट्रीय ताणतणाव त्यामानाने बऱ्याच प्रमाणात कमी झालेले आहेत.

(छ) मानवी हक्क डावलणाऱ्या राष्ट्रावर दबाव

कोणत्याही व्यक्तीला तिच्या राष्ट्रीयत्वापासून वंचित ठेवता येणार नाही तसेच एखाद्या व्यक्तीने आपले राष्ट्रीयत्व बदलण्याचा निर्णय घेतला तर त्याला त्यापासून परावृत्त देखील करता येणार नाही. असा स्पष्ट उल्लेख मानवी हक्कांच्या सनदेत करण्यात आलेला आहे. कोणतीही व्यक्ती आपल्या हक्कांच्या प्राप्तीसाठी सार्वभौम सत्तेला विरोध करू शकते. विशेष म्हणजे जे राष्ट्र आपल्या जनतेच्या मानवी हक्कांची पायमल्ली करते अशा राष्ट्रांवर अन्य राष्ट्रे दबाव आणू शकतात. परिणामी, जागतिक शांततेची स्थापना करण्यास अनुकूल वातावरण निर्माण होते.

**निष्कर्ष :**

मानवी अधिकारांबाबत चौफेर चर्चा चालू असून त्यांच्या उल्लंघनाची अशी गंभीर दखल घेतली जात असल्याचे आढळत असले तरी, मानवाधिकाराच्या आघाडीवर सारे काही अलबेल आहे असे म्हणण्याची मात्र सोय नाही. कारण ही चर्चा आणि दखल बव्हंशी औपचारीक स्वरूपाची व समाज विशिष्ट संदर्भ वगळून केलेली दिसते. दहशतवादी, गुन्हेगार, युद्धकैदी, अतिरेकी, इ. गटात असलेले किंवा पोलीसदलांनी त्या गटात ज्यांना बसविले आहे. अशा व्यक्तींच्या मानवी अधिकारांची जेवढी चर्चा उपरोक्त सर्व माध्यमातून घडते त्यामानाने देशातील

सामाजिक–आर्थिक चौकटीमूळे मानवी अधिकारांना जे पारखे राहतात त्यांच्याबाबत होत नाही. जणू तुरूंगात पोलीस कोठडयामध्ये, चकमकींच्या प्रसंगीच मानवी अधिकार पायदळी तुडविले जातात.त्याखेरीज समाजात सर्वत्र त्यांची जपणूकच होते असे चित्र त्यामुळे निर्माण होते. वस्तुतःते निखालस चूक आहे. गावोगावच्या वरचढ घटकांकडून दुबळया वर्गाच्या उच्च वर्णीयांकडून निम्नवर्णीयांच्या पुरूषी वि.ती व अहंकारातून स्त्रियांच्या घराघरातून बालकांचा जो छळ होते तो इतका सुक्ष्म झालेला असतो की त्याची दखल मानवी अधिकाराच्या समर्थकांना घ्यावीशी वाटत नाही.

*संदर्भ :*

1) *प्रा. शेख दशम व डॉक्टर राजेंद्र गवई, आंतरराष्ट्रीय संबंध , विश्व पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर प्रथमआवृत्ती नोवेंबर 2018*

2) *राठोड व सुशांत चिमणकर , अंशुल पब्लिकेशन नागपुर प्रथमआवृत्ती 2018*